जुन्या रोजगार हमी योजनेंतर्गत दि. १.४.०८
रोजी अपूर्ण असलेली शासन मान्य यादीतील
अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी विशेष
मोहिमेस मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग (रोहयो)
शासन निर्णय क्रमांक रोहयो -२०१३/प्र.क्र.४५६/रोहयो-८
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक :-3 फेब्रुवारी, २०१५.

वाचा :-

१) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक रोहयो- २०१३/ प्र.क्र.४५६/रोहयो-८, दि. २३ डिसेंबर, २०१३.

२) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक रोहयो-२०१२/प्र.क्र.१०३/रोहयो-८, दि. ३०, डिसेंबर, २०१४.

प्रस्तावना :-

राज्यामध्ये सन २००६, २००७ व २००८ या तीन टप्प्यात केंद्र शासनाची महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना लागू झाली. यामधील शेवटचा टप्पा दिनांक १/४/२००८ पासून कार्यान्वित झाला. त्यामुळे दिनांक १/४/२००८ रोजी जुन्या रोजगार हमी योजने अंतर्गतची अपूर्ण असलेली व नवीन योजनेमध्ये हस्तांतरीत होऊ न शकलेली अपूर्ण कामे यांचा आढावा घेण्याचे निदेश सर्व जिल्हाधिकारी यांना देण्यात आले होते. आढाव्याअंती अशी अपूर्ण कामे तीन वर्षाचा कालबध्द कार्यक्रम आखुन जुन्या रोजगार हमी योजनेच्या पध्दतीनुसार पूर्ण करण्यास मान्यता देण्यात आली होती. ही अपूर्ण कामे पूर्ण करण्याची मुदत (सर्वसाधारणपणे) दिनांक ३० जून, २०१२ पर्यंत होती. या विहित मुदतीत काही अपूर्ण कामे पूर्ण न झाल्याने व मंत्रीगटाच्या शिफारशींच्या अनुषंगाने ती पूर्ण करण्यासाठी दिनांक ३० जून, २०१३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. या अपूर्ण कामावर झालेला खर्च वाया जाऊ नये तसेच या कामांचा जास्तीत जास्त लाभ जनतेस होण्याच्या दृष्टीने दि. ३० जून, २०१४ पर्यंत ही कामे पूर्ण करण्यास मुदतवाढ देण्यात आली होती. ती आता संदर्भिय अनुक्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये दिनांक ३० जून, २०१५ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

दरम्यानच्या काळात प्रत्येक वर्षी मजुरांच्या मजुरीच्या दरात, जिल्हा दरसुचीत, गौण खनिजाच्या दरात वाढ झालेली आहे. त्यामुळे ही अपूर्ण कामे जुन्या दरानुसार पूर्ण करण्यामध्ये अडचणी निर्माण होत आहेत. तसेच ही कामे ब-याच कालावधीपासून अपूर्ण असल्याने विहित अटींमध्ये , मापदंडामध्ये, प्रमाणामध्ये व

वित्तीय अधिकारामध्ये करण्यास अडचणी निर्माण झालेल्या आहेत. अशा परिस्थितीत ही अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी दिनांक २३ डिसेंबर, २०१३ च्या शासन निर्णयान्वये एक विशेष मोहिम राबविण्यास मान्यता देण्यात आली होती. सध्या अशी अपूर्ण कामे पूर्ण करण्यास दिनांक ३० जून, २०१५ पर्यंत मुदतवाढ दिली असल्याने विशेष मोहिम राबविण्यासही मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहेत.

शासन निर्णय :-

जुन्या रोजगार हमी योजनेतील शासनमान्य यादीतील पूर्ण झालेली व वगळलेली कामे सोडून निव्वळ शिल्लक असलेल्या कामांची जिल्हानिहाय संख्या सोबतच्या प्रपत्र-अ मध्ये देण्यात आलेली आहे. ही अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी दिनांक ३० जून, २०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. या मुदतीत सदरची अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत शासन निर्णय, नियोजन विभाग (रोहयो) क्रमांक रोहयो-२०१३/प्र.क्र.४५६/रोहयो-८, दिनांक २३ डिसेंबर, २०१३ अन्वये राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेस दिनांक ३० जून, २०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

**हे आदेश विशेष मोहिमे अंतर्गत फक्त दि. ३०/६/२०१५ पर्यंतच अंमलात राहतील.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(आर विमला)
उप सचिव (रोहयो)
3/2/2015

प्रति,
मा.मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव.
मा. सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
उप सचिव, विधानमंडळ रोहयो समिती (४० प्रती)
सर्व उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी (रोहयो प्रभाग)
निवड नस्ती, रोहयो-८.

शासन निर्णय, नियोजन विभाग (रोहयो), क्रमांक : रोहयो-२०१३/प्र.क्र.४५६/रोहयो-८,
दि. ३ फेब्रुवारी, २०१५ सोबतचे प्रपत्र-अ

| अ. क्र. | प्रश्नावली अंती जिल्ह्यातील निव्वळ शिल्लक कामांची संख्या | जिल्हाधिकारी यांच्याकडील पत्र क्रमांक व दिनांक | दि. ३१/७/२०१४ रोजी पूर्ण/ वगळलेल्या कामांची संख्या | | | दि. ३१.७.२०१४ रोजी शिल्लक कामांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्ण | वगळलेली | एकूण | |
| १ | औरंगाबाद (६३) | जा.क्र.२०१४/ग्राभूरोहका/तांत्रिक/१५३३/कावि-, दि. ७.८.२०१४. | २५ | ८ | ३३ | ३० |
| २ | जालना (६२) | जा.क्र.२०१४/मग्रारोहयो/कार्या-५, सीआर, दि. २०.८.२०१४. | १२ | ३१ | ४३ | १९ |
| ३ | परभणी (१६) | जा.क्र.जि.प./ल.पा.वि./लेखा-३/७३४, दि. ६.८.२०१४. | ३ | ५ | ८ | ८ |
| ४ | लातूर (४७) | जा.क्र.२०१४/रोहयो/कक्ष-२/कावि/११०९, दि. ८.८.२०१४. | ३५ | १ | ३६ | ११ |
| ५ | उस्मानाबाद (१०१) | जा.क्र.२०१४/मग्रारोहयो/तां.शा./सीआर-१, दि.१६.८.२०१४. | २४ | - | २४ | ७७ |
| ६ | हिंगोली (१२) | जा.क्र.२०१४/मग्रारोहयो/कावि, दि..११.८.२०१४ | ८ | ३ | ११ | १ |
| ७ | नांदेड (५३) | जा.क्र.२०१४/रोहयो/तां.शा./अपूर्ण कामे/९९४/ दि. १४.८.२०१४. | ३ | ३६+१४ | ५३ | ० |
| ८ | बीड (४२७) | जा.क्र.२०१४/मग्रारोहयो/तांत्रिक/२०१४, दि .१४.८.२०१४. | २२१ | १३१ | ३५२ | ७५ |
| | ७८१ | | ३३१ | २२९ | ५६० | २२१ |
| ९ | अहमदनगर (५) | क्र.रोहयो/कार्या-१८(५)/२१६/२०१४, दि .५.८.२०१४. | १ | - | १ | ४ |
| १० | जळगाव (२४) | क्र.मग्रारोहयो/उपअभि/कावि-१०३/२०१४, दि. १३.८.२०१४. | २ | - | २ | २२ |
| ११ | धुळे (३) | क्र.रोहयो/जि-३/कावि/५२२/२०१४, दि. १३.८.२०१४. | ० | ० | ० | ३ |
| १२ | नाशिक (२३) | क्र.कक्ष-११/रोहयो-८/१७८/२०१४, दि. ६.८.२०१४. | १ | ० | १ | २२ |
| १३ | नंदूरबार (६) | क्रमांक/मग्रारोहयो/दप/२६१/२०१४, दि. ५.८.२०१४. | ५ | १ | ६ | ० |
| | ६१ | | ९ | १ | १० | ५१ |
| १४ | अकोला (१) | क्र.कक्ष-२१/रोहयो/दप/कावि-२३४/१४, दि. १४.८.२०१४. | ० | ० | ० | १ |
| १५ | यवतमाळ (१५) | क्र.ता.शा./रोहयो/कावि/३८/२०१४, दि. २५.०८.२०१४. | १३ | ० | १३ | २ |
| १६ | बुलढाणा (४) | दि.५.८.२०१४ चा ई-मेल. | ० | ४ | ४ | ० |
| | २० | | १३ | ४ | १७ | ३ |
| १७ | सांगली (३) | जा.क्र.रोहयो/कार्या-१३/आरआर-२/३३७/२०१४, दि..११.८.२०१४ | ३ | ० | ३ | ० |
| | ३ | | ३ | ० | ३ | ० |
| १८ | भंडारा (११) | क्र.जिकाभं/रोहयो/तांत्रिक/कावि-९९३/२०१४, दि. ८.८.२०१४. | ७ | ४ | ११ | ० |
| | ११ | | ७ | ४ | ११ | ० |
| १९ | रत्नागिरी (२) | क्रमांक.मग्रारोहयो-१/जुनीरोहयो/कामे/सदयस्थिती/ ८-१४, दि. १३.८.२०१४. | ० | ० | ० | २ |
| | एकूण (८७८) | | ३६३ | २३८ | ६०१ | २७७ |